जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
दिनांक 6 NOV 2010
विभाग उप अभियंता

९६५
८।११।१०

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र.इआयो २०१०/प्र.क्र. ३२१ /योजना-१०,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक २ ऑक्टोबर, २०१०

वाचा :- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. बीसीएच-२००९/प्र.क्र.१५१/मावक-२ दि. ९.३.२०१०

२) शासन निर्णय, क्र.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र इआयो २०१० /प्रक्र.१२८ / योजना-१०, दि.९ एप्रिल, २०१०.

३) शासन निर्णय, क्र.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२००९ / प्र.क्र.१५१/मावक-२ दि.६ ऑगस्ट, २०१०.

४) शासन परिपत्रक क्र. इआयो-२०१०/ प्र.क्र.२५७/योजना-१०, दिनांक ११ ऑगस्ट, २०१०.

**परिपत्रक :-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या घरकुल योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजनेअंतर्गत सन २०१०-११ चे जिल्हानिहाय उद्दिष्ट आपणास कळविण्यात आले असून त्यात एकूण ६८५०० घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्याकरिता आवश्यक निधी सामाजिक न्याय विभागाच्या संचालक, समाज कल्याण यांचेमार्फत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांचेकडे हस्तांतरित करण्यात येत आहे.

सदर योजनेची अंमलबजावणीकरिता इंदिरा आवास योजनेंतर्गत या विभागाच्या घरकुल वाटपाच्या शासन निर्णय दि. ९.४.२०१० नुसार जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतीमध्ये अनुसूचित जाती / जमातीचे लाभार्थी संख्या ६०% पूर्ण करावयाचे आहेत. शासन निर्णय दि. ९.४.२०१० नुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतनिहाय अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांची यादी जेथे थांबली असेल तेथून पुढे सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुलांचे वाटप करण्यात यावे. जेणेकरुन राज्यातील इंदिरा आवास योजनेच्या कायम प्रतिक्षा यादीतील जास्तीत जास्त अनुसूचित जातीचे लाभार्थींना घरकुलाचा लाभ मिळेल. मात्र इंदिरा आवास योजना व सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना या दोन्ही योजनांचा भौतिक व आर्थिक तपशील स्वतंत्र ठेवावा. मात्र या योजनेसाठीचा लाभार्थी हा दारिद्र्य रेषेखालील बेघर कुटुंबांच्या कायम प्रतिक्षा यादीतील अनुसूचित जाती / नवबौध्द संवर्गातीलच असेल. सदरच्या लाभार्थीस एकूण अनुदान रु. ६८५००/- देय असून ते ग्राम विकास विभागाचे परिपत्रक दि. ११ ऑगस्ट, २०१० नुसार देण्यात यावे. याबाबत सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व अन्य संबंधित कार्यालयास अवगत करण्यात यावे. आपल्या जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठीची सर्व घरकुले मंजूर करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

FAX NO. :

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या घरकुल योजनेच्या कामावर वैयक्तिकरित्या लक्ष देवून नियमितपणे या कार्यवाहीचा मासिक अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अविनाश

( अविनाश सुभेदार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा(सर्व)
उपायुक्त (विकास) सर्व,
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व